सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

१ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई-३२,

क्रमांक: रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११, दि.१३/०१/२०२६.

संदर्भ:- १) महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५.

२) राज्यातील १२ जिल्हापरिषद व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम क्रमाक :- रानिआ / जिपपंस - २०२५ / प्र.क्र. ४८ / का .७, दि.१३ जानेवारी २०२६.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ ट' (२४३K) आणि '२४३ यक' (२४३ZA) अन्वये; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यांतील तरतुदीन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेले आहेत; आणि

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडाव्यात, यासाठी 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' (रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र. २४/का.११दि. ५ मे २०२५) निर्गमित केला आहे; आणि

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने उक्त संदर्भ क्र.२ अन्वये राज्यातील १२ जिल्हापरिषद व त्या अंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या घोषित केलेल्या कार्यक्रमामध्ये नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी दि.१६ जानेवारी २०२६ ते दि.२१ जानेवारी २०२६ असा नमूद केला आहे; आणि

ज्याअर्थी, या अनुषंगाने उक्त संदर्भ क्र.१ च्या परिच्छेद १७ मधील (५) व (६) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या मर्यादेत शिथिलता आणणे क्रमप्राप्त आहे;

त्याअर्थी, सदर आदेशाच्या परिच्छेद २७ मधील राज्य निवडणूक आयोगास प्राप्त अधिकारान्वये विशेष बाब म्हणून केवळ उक्त संदर्भ क्र.२ अन्वये निर्गमित केलेल्या निवडणूक कार्यक्रमापुरताच परिच्छेद १७ मधील (५) व (६) मधील तरतूद खालीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ आदेश दि. ०५ मे, २०२५ मधील परिच्छेद १७(५) व १७(६) मधील आधीच्या तरतुदी सुधारित करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहेत:

**उक्त आदेशातील परिच्छेद १७ च्या (५) व (६) मधील तरतुदी**

**१७ . नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करणे:**

(५) तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करण्यासाठी नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच आणि नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात होण्यापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवस आधी परिच्छेद १७ (२) मध्ये विनिर्दिष्टीत सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे अनिवार्य राहील. सदर अर्जात मुक्त चिन्हांपैकी तीन चिन्हे प्राधान्य क्रमानुसार ठळकपणे नमूद करावी लागतील.

(६) सक्षम प्राधिकारी सदर अर्जावर नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात होण्याच्या १ दिवस आधी निर्णय घेईल व तात्काळ संबंधित राजकीय पक्षाला आणि सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवेल.

**या ऐवजी,**

<u>सुधारित तरतूदी</u>

**१७ . नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करणे:**

*(५) तात्पुरत्या स्वरुपात चिन्ह आरक्षित करण्यासाठी नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच ते दि. १५ जानेवारी, २०२६ पर्यंत परिच्छेद १७(२) मध्ये विनिर्दिष्टीत सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे अनिवार्य राहील. सदर अर्जात मुक्त चिन्हांपैकी तीन चिन्हे प्राधान्यक्रमानुसार ठळकपणे नमूद करावी लागतील.*

*(६) सक्षम प्राधिकारी सदर अर्जावर दि.१६ जानेवारी, २०२६ पर्यंत निर्णय घेतील व तात्काळ संबंधित राजकीय पक्षाला आणि सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवेल.*

वर नमूद केल्याप्रमाणे सदरची शिथिलता ही केवळ संदर्भ क्र.२ अन्वये दि.१३ जानेवारी, २०२६ रोजी निर्गमित केलेल्या ज़िल्हा परिषद / पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमापुरतीच लागू राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

१३.०१.२०२६

(सुरेश काकाणी)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त

२) सर्व जिल्हाधिकारी, सदर आदेशाबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना तात्काळ सूचित करावे तसेच, याबाबत स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिध्दी द्यावी

३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी

४) राज्य निवडणूक अयोगातील सर्व कार्यासने

५) निवड नस्ती